# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०४/०५/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा किन्हाळा सातगाव येथे दिनांक २७.०४.२२ चे १२.०० ते ०३.०५.२२ चे १०.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– तपन क्रिष्णपद मंडल, वय ३७ वर्ष, रा. किन्हाळा सातगाव यांचे सातगाव किन्हाळा येथे घर आहे. फिर्यादी व त्याची पत्नी हे त्यांचा वडीलाची प्रकृती बरी नसल्याने त्यांचे मुळ गाव पक्कानजुर जि. कानकेर छत्तीसगढ येथे होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घरातील कडी–कोंडा तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने दोन्ही आलमारीतील सोन्या–चांदीचे दागीने कि. २७,०००/–रू. व नगदी २५,०००/–रु. असा एकुण ५२,०००/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नांदुरकर मो. क्रं. ७९७२०१४५०४हे करीत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत टाटा स्टिल कंपनी महालगाव कामठी येथे दिनांक ०३/०५/२०२२ चे ०१.०० वा. ते ०९.४२ वा. सुमारास फिर्यादी नामे– आशिष नरसिंगपराव खंडागळे, वय ३४ वर्ष, रा. २०२ श्रीक्रीष्ण अपार्टमेन्ट अंबाझरी नागपुर हे रेडीयंट फॅसिलीटी या सुरक्षा कंपनीमध्ये फिल्ड ऑफिसर या पदावर कार्यरत आहे. दि. ०३/०५/२२ रोजी सकाळी ०९.४२ वा. फिर्यादी यांना टेकनिशीयन डोगरे यांनी फोन करुन सांगितले टाटा स्टिल कंपनीच्या आत असलेल्या टॉवर वरुन २४ बॅट–या चोरी गेल्या आहे. यावरुन फिर्यादी स्वताह टाटा कंपनी महालगाव मध्ये टावर वर जावून पाहनी केली असता टॉवर वरील २४ बॅट–या चोरीस गेल्याच्या दिसून आले. दि. ०३/०५/२२ रोजी मध्यरात्री ०१.०० वा. मौजा महालगाव टाटा स्टिल कंपनीच्या आत विध्युत पुरवठा करण्यासाठी लावण्यात आलेल्या अमर राजा कंपनीच्या एकूण २४ बॅट–या कि. १५,०००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार काळे मो.क्र. ९८२२५४९६९५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील वारेगाव ॲश बॅड येथे दिनांक ०३/०५/२०२२ चे ११.०० वा. ते ११.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे— अमोल चंद्रकांत धोंडे वय ४१ वर्ष, कनिष्ठ अधिकरी औषणीक विदयुत केंद्र यांना गोपनयि माहिती मिळाल्यावरुन ते आपल्या कर्मचारी सह वारेगाव ॲश बॅड येथे पाहीले असता तिथे आरोपी क्र. १) हरीषचंद्र हनुमंत चव्हान, रा. कामठी व २) शेषकुमार कैलास वासनिक रा. कामठी व इतर तिन इसम हे ॲश पाईप किमंती ९०,०००/—रु. चा मुद्देमाल संगनमत करुन गॅस कटरच्या सहायाने कापुन चोरी करतांना मिळुन आले. आरोपीच्या ताब्यातुन इ—रिक्शा, गॅस कटर व एक पाईप ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १ व २ ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक रेवतकर मो.नं. ९५४५५२३७३६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**